**वाचले** - महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्थानिक संस्था कर विभाग
क्र.स्थासंक/६/कावि/ ७८२ /२०१४
दिनांक - ३ /०५/२०१४

**विषय :- भारताच्या क्षेत्राबाहेर मालांची निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यास स्थानिक संस्था कराच्या आकारणी मधून सूट/सवलत देण्याबाबत**

**परिपत्रक,**

दिनांक १ एप्रिल २०१३ पासुन LBT ची अंमलबजावणी सुरु आहे. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० मधील नियम २८ (६) मध्ये भारताच्या क्षेत्राबाहेर मालांची निर्यात करणाऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यास अशी निर्यात करण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आलेल्या मालांच्या मूल्याच्या संबंधातील स्थानिक संस्था कराच्या आकारणी मधून सूट देण्यात येईल. अशी तरतूद आहे. सदर तरतूदीचे अनुषंगाने स्थानिक संस्था कराच्या आकारणी मधून सूट/सवलत मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जावर खालील कार्यपध्दती अंमलात राहील.

**१) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -**

१. स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत

२. व्यापा-यास माल भारताच्या क्षेत्राबाहेर निर्यात करण्यास परवानगी दिलेबाबत शासनाचे संबंधीत विभागाचे परवान्याची प्रत (Import/Export License)

३. ज्या मालावर स्थानिक संस्था करापासून सूट मागितलेली आहे,तो माल भारताच्या क्षेत्राबाहेरील व्यापा-यास विक्री करावयाचा असल्याबाबत दोहोंमधील त्याबाबतचा कराराची प्रत

४. भारताच्या क्षेत्राबाहेर मालाची निर्यात करण्याच्या प्रयोजनासाठी माल उत्पादन करण्यासाठी आवश्यक असणा-या कच्च्या मालाचे प्रमाणीत केलेली यादी. (Utilization Certificate)

**२) अटी व शर्ती -**

१. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० मधील तरतुदीनुसार कंपनीने आयात व निर्यात केलेल्या मालाची विवरणपत्रामध्ये नोंदी घेणे बंधनकारक राहील.

२. जो माल भारतामध्ये विक्री केला जाईल त्यावर वेळोवेळी नियमाप्रमाणे स्थानिक संस्था कर भरणे बंधनकारक राहील.

३. महानगरपालिकेने वेळोवेळी मागणी केल्यानुसार आवश्यक ते लेखे व कागदपत्रे तपासणीकामी उपलब्ध करुन देणे संबंधीतांवर बंधनकारक राहील. लेखे व कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास देण्यात आलेली सूट/सवलत रद्द केली जाईल व सूट/सवलत घेतलेली रक्कम नियमाप्रमाणे व्याजासहीत वसुल करण्यात येईल व अशी रक्कम भरणे संबंधीतांवर बंधनकारक राहील.

४. सूट/सवलत घेतलेला माल निर्यातीनंतर कोणत्याही कारणास्तव परत आल्यास अश्या मालावर स्थानिक संस्था कराची रक्कम व त्यावरिल नियमानुसार देय व्याज रक्कमेसह भरणे संबंधीतांना बंधनकारक राहील.

५. सूट/सवलत दिलेला माल भारताबाहेर निर्यात न करता देशाचे अंतर्गत भागात विक्री/निर्यात केलेचे निदर्शनास आलेस किंवा चूकीची सूट/सवलत घेतली गेल्याचे निदर्शनास आल्यास अशा मालावर महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० मधील नियम ४८ मधील तरतूदीनुसार स्थानिक संस्था कर व शास्तीच्या रकमा संबंधीतांकडून वसूल करणेत येतील.

६. स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील नियम २९ नुसार व्यापाऱ्यास वार्षिक विवरणपत्र विहित मुदतीत भरणे बंधनकारक राहील.

सबब भारताच्या क्षेत्राबाहेर मालाची निर्यात करणाऱ्यांना करीता स्थानिक संस्था करात सूट/सवलत देणेबाबत वरिलप्रमाणे कार्यपध्दती अंमलात राहील. सदर धोरणानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जावर सहाय्यक आयुक्त, स्थानिक संस्था कर विभाग यांनी पुढील कार्यवाही करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

**प्रत** - सर्व संबधित